महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/Sem-II-२०२५-२६/पाच/५९५ दिनांक:- 02 APR 2026

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/द्वितीय सत्र २०२६/पाच/E-३१२७२६६, दिनांक २७.०३.२०२६
२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/द्वितीय सत्र २०२६/पाच/E-३१४५४९०, दिनांक ०२.०४.२०२६

# परिपत्रक

**विषय : शासकीय उच्चकला परीक्षा (Semester II) (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)**
द्वितीय सत्र परीक्षेकरिता कला परिसंस्थांची नोंदणी/ अद्ययावत माहिती, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर करणेबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राज्यातील संलग्नित कला परिसंस्थांमधील पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित व परीक्षेस पात्र असलेल्या नियमित विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला द्वितीय सत्र **(Semester II)** परीक्षेचे तसेच यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परीक्षेमध्ये केवळ ATKT/FAIL असा निकाल असलेल्या विद्यार्थ्यांकरिता प्रथम सत्र **(Semester I)** परीक्षेचे वेळापत्रक संदर्भिय परिपत्रकांन्वये जाहीर करण्यात आले आहे.

०२. प्रस्तुत परीक्षेच्या अनुषंगाने सर्व संलग्न कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या द्वितीय सत्र **(Semester II)** परीक्षेकरिता आपल्या कला परिसंस्थेची ऑनलाईन नोंदणी/अद्ययावत माहिती आणि सदर परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या नियमित पात्र विद्यार्थ्यांचे तसेच यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परीक्षेमध्ये ATKT/FAIL असा निकाल असलेल्या पूर्नप्रविष्ठ (Repeater) विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र **(Semester I)** परीक्षेचे परीक्षा आवदेनपत्र व परीक्षा शुल्क कला परिसंस्थेमार्फत **दिनांक ०२.०४.२०२६ ते १०.०४.२०२६** या कालावधीत उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in** या लिंकवर ऑनलाईन सादर करावे. सदर लिंक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकतेस्थळावर Higher Art Exam या टॅबमध्येही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत सादर करण्याची तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०३. कला परिसंस्थेचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य) यांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर/ ई-मेलवर सत्र परीक्षेकरिता लागणारे गोपनीय युजरनेम व पासवर्ड यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्राप्त युजरनेम व पासवर्ड याद्वारे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी लॉगिन करुन कला परिसंस्थेची नोंदणी/अद्ययावत माहिती, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन सादर करावे.

०४. द्वितीय सत्र व प्रथम सत्र परीक्षेतील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य कला परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार विहित कार्यपध्दीचा अवलंब करुन परिसंस्था स्तरावर खरेदी करावे. परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी होणारा खर्च विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येणाऱ्या एकुण परीक्षा शुल्काच्या ३०% रकमेतून भागविण्यात यावा व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करण्यात यावे. कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमनिहाय जमा करावयाचे परीक्षा शुल्क, परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी जमा शुल्कातून कपात करावयाचे (३०%) शुल्क व कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरावयाचे प्रती विद्यार्थी (७०%) शुल्क याबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार, कला परिसंस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

०५. परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या कला परिसंस्थेतील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक व परीक्षा प्रवेशपत्र (Admit Card) संबंधित कला परिसंस्थांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी.

(विनोद दांडगे)
संचालक
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था

प्रत,

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.

## महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

### शासकीय उच्चकला परीक्षा (Semester Pattern)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६

परीक्षा शुल्काचे विवरणपत्र

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून जमा करावायाचे परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) (रु.) | कला परिसंस्थांनी परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी जमा परीक्षा शुल्कातून कपात करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (३०%) (रु.) | कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (७०%) (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲन्ड डिझाईन | ४०० | १२० | २८० |
| २ | कला शिक्षक पदविका | ६०० | १८० | ४२० |
| ३ | कला शिक्षणशास्त्र पदविका | ९०० | २७० | ६३० |
| ४ | आर्ट मास्टर प्रमाणपत्र | ६०० | १८० | ४२० |
| ५ | रेखा व रंगकला पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ६ | उपयोजित कला पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ७ | शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका | ८०० | २४० | ५६० |
| ८ | वस्त्रकला पदविका (प्रिंटींग ॲन्ड डाईंग) | ८०० | २४० | ५६० |
| ९ | वस्त्रकला पदविका (विव्हींग) | ८०० | २४० | ५६० |
| १० | अंतर्गत गृह सजावट पदविका | ८०० | २४० | ५६० |

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.